अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ

सायं.दैनिक महाराष्ट्र

# आरंभ

MO.9860898564

संपादक - दिपक थोरात

बीड (महाराष्ट्र) | सायं.दैनिक | मराठी | वर्ष -०१ | अंक -७५ | सोमवार दि.०४ डिसेंबर २०२३ | आरएनआय -एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ | किंमत ३ रू | । पाने ४

Beed (Maharashtra) | Daily Evening | MARATHI | Year-01 | Issue -75 | MONDAY DT.04 DECEMBER 2023 | RNI : MAHMAR/2023/83965 | PRICE - 3 RUPEES | PAGES - 4

## इंडोनेशियात माऊंट मेरापीवर ज्वालामुखीचा उद्रेक

### पर्यटनाला गेलेल्या ११ गिर्यारोहकांचा मृत्यू, अनेक



इंडोनेशियाच्या माउंट मेरापीवर ज्वालामुखीचा उद्रेक झाल्याची घटना घडली आहे. या भयंकर उद्रेकात ११ गिर्यारोहकाचा मृत्यू झाल्याची माहिती मिळाली आहे. या ज्वालामुखीची राख तीन किलोमीटर उंच उडाल्याचंही सांगण्यात आलं आहे.

मीडिया वृत्तानुसार, इंडोनेशियाच्या माउंट मेरापीवर झालेल्या ज्वालामुखीच्या घटनेनंतर २६ बेपत्ता असल्याची माहिती मिळाली आहे. या ज्वालामुखीनंतर सोमवारी सकाळी ११ गिर्यारोहकांचा मृतदेह सापडले आहेत. तर अन्य बेपत्ता २२ गिर्यारोहकांचा तपास सुरु करण्यात आला आहे.

स्थानिक अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, रविवारी इंडोनेशियाच्या पश्चिम भागात ही घटना घडली आहे. या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली आहे. या घटनेचा परिणाम इतर शहरांवरही झाला आहे.

# ओबीसी समाजाचे आजपासून वडीगोद्री येथे साखळी उपोषण



वडीगोद्री - ओबीसी समाज आरक्षण बचाव संघटनेच्या माध्यमातून अंतरवाली सराटी फाटा वडीगोद्री (ता. अंबड) येथे मंगळवार ता. ५ ते शनिवार ता. २३ डिसेंबर पर्यत साखळी उपोषण करण्यात येत आहे. या बाबतचे निवेदन मोटरसायकलची फेरी काढत सोमवार ता. ४ रोजी तहसील कार्यालय अंबड येथे नायब तहसीलदार धनश्री भालचिम यांना देण्यात आले.

या ठिकाणी भागातील वीस गावातील ओबीसी बांधव या साखळी उपोषण मध्ये सहभागी होत आहे. दररोज एक गाव यात सहभागी होणार आहे. मंगळवार ता. ५ रोजी वडीगोद्री या गावाचा जागर होत आहे.

न्यायमूर्ती शिंदे समिती तत्काळ रद्द करावी, वाटप करण्यात आलेले कुणबी जातीचे प्रमाणपत्र तत्काळ रद्द करावे, जात निहाय जनगणना करण्यात यावी, ओबीसी कोट्यातुन मराठा समाजास आरक्षण देऊ नये. आदी प्रमुख मागणीसाठी हे साखळी उपोषण करण्यात येत आहे. शासनाने या मागणी बाबत विचार न केल्यास २४ डिसेंबर पासून आमरण उपोषण करण्यात येणार असल्याचे संयोजक समितीने सांगीतले आहे.

मराठा समाजाला आरक्षण मिळावे म्हणून अंतरवाली सराटी येथे मनोज जरांगे यांच्या नेतृत्वाखाली मराठा समाजाचे आंदोलन सुरू आहे. तर मराठा समाजाला कुणबी मधुन ओबीसीमध्ये आरक्षण देण्यात येऊ नये, वाटप केलेले कुणबी प्रमाणपत्र रद्द करण्यात यावे आदी मागणी करीता अंतरवाली सराटी फाटा वडीगोद्री येथे ओबीसी समाजाचे साखळी उपोषण होत आहे. यामुळे शासन या दोन्ही आंदोलन कसे हातळणार याकडे नागरीकांचे लक्ष लागले आहे.

## शासन आपल्या दारी कार्यक्रमातून बीड मतदारसंघाच्या विकासाला गती मिळणार

### डॉ.योगेश क्षीरसागर यांचे प्रतिपादन; बीडमध्ये 'शासन आपल्या दारी'च्या अनुषंगाने बैठक

बीड (प्रतिनिधी)

पालकमंत्री धनंजय मुंडे यांच्या पुढाकारातून परळीत उद्या (दि.५) शासन आपल्या दारी कार्यक्रमाचे भव्य आयोजन केले आहे. या कार्यक्रमासाठी मुख्यमंत्री, दोन्ही उपमुख्यमंत्री येणार आहेत. या कार्यक्रमातून बीडच्या विकासाला गती मिळणार आहे, असा विश्वास राष्ट्रवादी कॉंग्रेसचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांनी व्यक्त केला.



शासन आपल्या दारी कार्यक्रमाच्या अनुषंगाने बीड मतदारसंघातील नियोजनाचा आढावा घेण्यासाठी बीडमध्ये डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या अध्यक्षतेखाली बैठक पार पडली. यावेळी ते बोलत होते. याप्रसंगी राष्ट्रवादी कॉंग्रेसचे पदाधिकारी, नगरसेवक, प्रमुख कार्यकर्त्यांची उपस्थिती होती.

पुढे बोलताना डॉ.योगेश क्षीरसागर म्हणाले की, शासन आपल्या दारी कार्यक्रमास लाभार्थ्यांना घेऊन जाण्याची व्यवस्था केली आहे. पदाधिकारी, नगरसेवकांनी पुढाकार घेऊन नागरिकांसह लाभार्थ्यांची सोय करावी, अशा सूचना केल्या. उपमुख्यमंत्री अजित पवार हे बीड मतदारसंघातील विकासासाठी सकारात्मक आहेत. त्यांच्या माध्यमातून आगामी अधिवेशनात ग्रामीण आणि शहरी भागातील रस्त्यांसाठी निधीची भरीव तरतूद होईल. पंतप्रधान ग्रामसडक योजना, मुख्यमंत्री ग्रामसडक योजना, सामाजिक न्याय अंतर्गत निधी, नगरोत्थान योजना, विशेष बाब व दलित वस्ती यासह अन्य योजनेतून निधी मोठ्या प्रमाणावर मिळणार आहे. तसेच, सुरू असलेली कामे गतीने पूर्ण करावीत, अशा सूचना त्यांनी केल्या. शहरातील पाणी पुरवठा योजनेसह अतिरिक्त विद्युत पुरवठा, महालक्ष्मी चौक ते छत्रपती संभाजी महाराज चौक (बायपास) रोडचा प्रश्न, स्वच्छता, नाट्यगृह हे प्रश्न सोडवावा, अशी मागणी शासनाकडे करणार आहोत, अशी माहिती डॉ.योगेश क्षीरसागर यांनी दिली. प्रास्ताविक माजी नगरसेवक सुभाष सपकाळ यांनी करून सूत्रसंचलन केले. आभार सनी वाघमारे यांनी मानले.

**लाभार्थ्यांच्या व्यवस्थेसाठी कार्यकर्त्यांनी पुढाकार घ्यावा -डॉ.योगेश क्षीरसागर**

बीडमधील बसस्टँड, नाळवंडी नाका, खंडेश्वरी देवि मंदिर, कंकालेश्वर मंदिर, काळा हनुमान ठाणा, बार्शी नाका, संत नामदेव नगर, पुरग्रस्त कॉलनी या भागातून लाभार्थ्यांसाठी ६० बसची व्यवस्था केली आहे. प्रवासाची व्यवस्था मोफत असून महिलांसाठी विशेष बस आहेत. लाभार्थ्यांची नाश्त्याची व्यवस्था आहे. त्यांना कार्यक्रमास घेऊन जाण्यासाठी पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी सहकार्य करावे, असे आवाहन डॉ.योगेश क्षीरसागर यांनी केले आहे.

**योगेश क्षीरसागरांना आमदार करायचे आहे-बप्पासाहेब घुगे**

परळीतील शासन आपल्या दारी कार्यक्रमाचे मोठे नियोजन आहे. त्याअनुषंगाने तयारी पूर्ण झाली आहे. याचसोबत बीडमध्ये पक्षीय कार्यक्रमांचे सातत्याने नियोजन केले जावे. जेणेकरून संघटनशक्ती मजबूत होईल. आपल्याला योगेश क्षीरसागर यांच्या रूपाने हक्काचा आमदार करायचा आहे, असे आवाहन जिल्हा सरचिटणीस बप्पासाहेब घुगे यांनी केले.

शेतकऱ्यांना आर्थिक साह्य; अधिकाऱ्यांना तात्काळ पंचनामे करण्याच्या दिल्या सूचना

## शिवसेनेचे नवनिर्वाचित जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते थेट शेतकऱ्यांच्या बांधावर!

बीड ।प्रतिनिधी

अवकाळी पावसाने शेतकऱ्यांच्या हाता तोंडाला आलेला घास पुन्हा हिसकावला. नियतीने पुन्हा एकदा आपला डाव साधत बळीराजाला दारिद्र्याच्या काळोखात लोटले. अडचणीच्या डोंगराखाली शेतकरी माय-बाप चेपलेला असताना हार फुले तुरे घेऊन मिरवण्यात कसला आला थाट आणि माणुसकी? या सर्व बाबींचा विचार करून शिवसेनेचे नवनिर्वाचित जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते काल दि. ३ डिसेंबर रोजी सकाळच्या दरम्यान आष्टी येथे थेट शेतकऱ्यांच्या बांधावर पोहचले.

आष्टी मतदारसंघातील बावी या गावामधील बद्रीनाथ गोल्हार नामक शेतकऱ्याने त्याच्या कांद्याचं अवकाळी पावसामध्ये प्रचंड नुकसान झाल्याने तो आत्महत्या करणार आहे असे त्यांनी सोशल मीडियावरून पोस्ट केल्यानंतर याबाबत शिवसेनेचे जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते यांनी तात्काळ बावी गावामध्ये जाऊन त्या शिवसैनिकांसह शेतकऱ्याची भेट घेतली व शेतकऱ्याच्या झालेल्या अवकाळी पावसानेच्या नुकसानीची पाहणी केली. सदर बाबींमध्ये शिवसेनेचे पक्षप्रमुख उद्धवजी ठाकरे साहेब यांनी दिलेल्या आदेशाप्रमाणे जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते यांनी शेतकऱ्यांच्या नुकसानीची पाहणी केली व त्यांना आधार दिला आणि रोख रक्कम स्वरूपामध्ये शेतकऱ्यांना आर्थिक साह्य तात्काळ सुपूर्द केले. आत्महत्या करण्याचा विचार असणाऱ्या शेतकऱ्यांस परमेश्वर सातपुते यांनी आत्मविश्वास देऊन त्याची मन धरणी करत त्याच्या मनातील आत्महत्याचे खूळ बाजूला काढले व हिंमतीने आयुष्य जगण्याचा कानमंत्र दिला. अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांच्या नुकसानाची पाहणी केली.



### शेतकऱ्यांनो धीर सोडू नका, शिवसेना तुमच्या पाठीशी- परमेश्वर सातपुते

नियतीने जरी डाव साधला असला तरी शेतकऱ्यांनो धीर सोडू नका, शिवसेना तुमच्या समवेत आहोत, असा विश्वास जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते यांनी शेतकऱ्यांना दिला. दरम्यान जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते यांनी एसडिएम आणि आष्टी तहसीलदार यांच्याशी बांधवरून संपर्क साधला व तात्काळ पिकाच्या झालेल्या नुकसानीचे पंचनामे करून पीडित शेतकऱ्यांना मदत पुरवण्याच्या सूचना दिल्या. एसडिएम आणि आष्टी तहसीलदार यांनी देखील जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते यांच्या सूचनांची दखल घेत येत्या दोन-तीन दिवसात पिकांच्या नुकसानीचे पंचनामे करून घेऊ व मदतीसाठी शासन दरबारी अहवाल पाठवू असा शब्द दिला. याप्रसंगी बांधावर पीडित शेतकरी, ग्रामस्थ तथा शिवसेनेचे पदाधिकारी आणि शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# परळीतील शासन आपल्या दारी कार्यक्रमाच्या निमित्ताने बीड जिल्ह्यात होणार विकासाची नवी नांदी !

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अजितद पवार,महसूलमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, उद्योग मंत्री उदय सामंत, कृषीमंत्री धनंजय मुंडे यांसह मान्यवर राहणार उपस्थित

परळी (प्रतिनिधी)

बीड जिल्ह्यातील परळी वैद्यनाथ येथे मंगळवार दि.५ डिसेंम्बर रोजी होणाऱ्या शासन आपल्या दारी या कार्यक्रमाच्या माध्यमातून बीड जिल्ह्यातील शेकडो विकासकामांचे भूमिपूजन, पूर्ण झालेल्या कामांचे लोकार्पण तसेच काही नवीन प्रकल्पांची घोषणा होणार असून, हा कार्यक्रम बीड जिल्ह्याच्या विकासाची नांदी ठरणार आहे.

या कार्यक्रमासाठी राज्याचे मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजितदादा पवार, महसूलमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, उद्योगमंत्री उदय सामंत, कृषिमंत्री धनंजय मुंडे यांच्यासह मान्यवर तसेच जिल्ह्यातील लोकप्रतिनिधी, प्रशासनातील उच्च पदस्थ अधिकारी आदींची उपस्थिती लाभणार आहे.

**शासकीय कार्यक्रमाच्या अगोदर होणार अभूतपूर्व स्वागत**

दरम्यान शासकीय कार्यक्रमास सुरुवात होण्या अगोदर कृषिमंत्री धनंजय मुंडे यांच्या संकल्पनेतून व ज्येष्ठ नेते वाल्मिक अण्णा कराड यांच्या मार्गदर्शनाखाली परळी शहरात प्रथम आगमनानिमित्त सर्व मान्यवरांच्या अभूतपूर्व स्वागत रॅलीचे आयोजन छत्रपती शिवाजी महाराज चौकातून करण्यात येत आहे.



शेकडो कोटींच्या कामांचा होणार मंगळवारी शुभारंभ, तर अनेक पूर्ण कामांचे होणार लोकार्पण

विविध शासकीय योजनांच्या जिल्ह्यातील सुमारे २२ हजार लाभार्थींना होणार थेट लाभाचे वितरण

परळीत कृषिमंत्री धनंजय मुंडे यांच्या व महायुतीच्या वतीने मुख्यमंत्री, दोन्ही उपमुख्यमंत्री व मान्यवरांचे होणार अभुतपूर्व स्वागत

या रॅलीसाठी संपूर्ण परळी शहर दिवाळी सारखे सजले असून, या रॅलीत महायुतीतील पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती राहणार आहे.या स्वागत रॅली मध्ये मणिपूर, केरळ, तिरुपती बालाजी, आंध्र प्रदेश, पंजाब, मुंबई आदी सहा ठिकाणावरून खास बँड पथक पाचारण करण्यात आले आहेत. तसेच पुष्पवृष्टी व रोषणाईद्वारे अभूतपूर्व स्वागत या ठिकाणी करण्यात येईल. या रॅलीचा शेवट मौलाना आझाद चौकात आल्यानंतर होईल व त्यानंतर मुख्य शासकीय कार्यक्रमास सुरुवात होईल.

### या कामांचा होणार शुभारंभ

परळी तालुक्यातील सिरसाळा एमआयडीसी उभारणीचे भूमिपूजन, परळी वैद्यनाथ तीर्थक्षेत्र विकासाच्या २८६ कोटी ६८ लाख रुपयांच्या आराखड्याचे भूमिपूजन, परळी तालुक्यात कृषी विभागामार्फत उभारण्यात येत असलेल्या सोयाबीन संशोधन केंद्र, कृषी महाविद्यालय व कृषी व्यवसाय व्यवस्थापन महाविद्यालय या तीन शासकीय संस्था उभारणीच्या ३११ कोटींच्या कामांचे भूमिपूजन, बीड जिल्हाधिकारी कार्यालय इमारतीच्या ६१ कोटी रुपयांच्या बांधकामाचे भूमिपूजन, परळी शहर बसस्थानकाच्या सुधारित कामाचे भूमिपूजन, यांसह बीड जिल्ह्यातील विविध विकासकामांचे भूमिपूजन तसेच परळी कृषी उत्पन्न बाजार समितीच्या वतीने सिरसाळ्यात उभारण्यात आलेल्या कै. पंडित अण्णा मुंडे व्यापारी संकुलाचे लोकार्पण आणि जिल्ह्यातील ११ तालुक्यातील सुमारे २२ हजार लाभार्थींना विविध योजनेतील लाभाचे थेट वाटप या कार्यक्रमाच्या निमित्ताने करण्यात येणार आहे.

### असा असेल मुख्यमंत्री व अन्य मंत्र्यांचा एकूण कार्यक्रम

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांसह सर्व मान्यवर सुरुवातीला गोपीनाथगड (पांगरी) येथे येणार असून त्याठिकाणी ते लोकनेते स्व.गोपीनाथराव मुंडे यांच्या स्मृतिस्थळी अभिवादन करणार आहेत. त्यानंतर ते १२ ज्योतिर्लिंगांपैकी पाचवे ज्योतिर्लिंग असलेल्या प्रभू वैद्यनाथांचे दर्शन घेतील व त्याठिकाणी २८६.६८ कोटी रुपयांच्या वैद्यनाथ तीर्थक्षेत्र विकास आराखड्याचे भूमिपूजन करतील. त्यानंतर छत्रपती शिवाजी महाराज चौकात छत्रपती शिवरायांना वंदन केल्यानंतर धनंजय मुंडे यांच्या संकल्पनेतुन आयोजित स्वागत रॅलीचे आयोजन करण्यात आले असून, या रॅली नंतर थेट कार्यक्रम स्थळी वैद्यनाथ कॉलेज समोरील मैदान येथे येतील व मुख्य शासकीय कार्यक्रमास सुरुवात होईल.

# मुंडेंच्या परळीत उद्या शासन आपल्या दारी

## खासदारांची असणार अनुपस्थिती, पंकजा मुंडेंच्या भूमिकेकडे बीडवासियांचे लक्ष

प्रतिनिधी । बीड

**बीड जिल्ह्यातील परळी शहरात उद्या शासन आपल्या दारी या राज्य शासनाच्या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमास भाजप नेत्या पंकजा मुंडे हजेरी लावणार असल्याची प्राथमिक माहिती प्राप्त झाली आहे. मात्र जिल्ह्याच्या खासदार डॉक्टर प्रीतम मुंडे या कार्यक्रमाला गैरहजर राहणार असल्याची खात्रीशिर माहिती उपलब्ध झाली आहे.**

परळीत शहरात शासन आपल्या दारी हा कार्यक्रम भव्य दिव्य स्वरूपात होत आहे. या कार्यक्रमाला भाजप नेत्या पंकजा मुंडेची राहणारी उपस्थिती ही सर्वत्र चर्चेची विषय बनली आहे. दरम्यान आजपासून दिल्लीत संसदेचे हिवाळी अधिवेशन सुरू झाले आहे. यामुळे खासदार डॉ. मुंडे या दिल्लीत असल्याने त्या कार्यक्रमाला हजेरी लावणार नसल्याचे सांगण्यात आले आहे.

विशेष म्हणजे भाजपात पंकजा मुंडे आणि देवेंद्र फडणवीस यांच्यामधील अंतर्गत वाद सर्वश्रुत आहे. मात्र या कार्यक्रमाला मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार येत असून सर्वात अगोदर ते दिवंगत लोकनेते गोपीनाथराव मुंडे



यांच्या गोपीनाथ गडावर जाऊन समाधीस्थळी नतमस्तक होणार आहेत.

यादरम्यान भाजप नेत्या पंकजा मुंडे या देखील याठिकाणी उपस्थित असणार असल्याची माहिती सूत्रांकडून मिळाली आहे. त्यामुळं आता पंकजा मुंडे या गोपीनाथगड आणि त्यानंतर परळी शहरातील शासन आपल्या दारी या कार्यक्रमाला उपस्थित राहणार का ? याकडेच सर्वांचे लक्ष लागले आहे.

# जागतिक दिव्यांग दिन उत्साहात साजरा

बीड ।प्रतिनिधी

समाज कल्याण विभाग, जिल्हा परिषद बीड यांच्या वतीने जागतिक दिव्यांग दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन येथे जिल्ह्यातील विविध स्वयंसेवी संस्था, रोटरी क्लब ,दिव्यांग कर्मचारी संघटना दिव्यांग शाळेतील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी तसेच बीड जिल्ह्यातील दिव्यांग बंधू आणि भगिनी यांच्या उपस्थितीत दिव्यांग दिनानिमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

येथील बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन येथून दिव्यांग जनजागृती रॅली काढण्यात आली. प्रेरणदायी घोषणा देत दिव्यांगान प्रति सहानुभूती व अनुकंपा ठेवून काम करण्यासाठी समाज बांधवांना आवाहन करण्यात आले. त्यानंतर मुख्य प्रशासकीय कार्यक्रमास सुरुवात झाली. अंध विद्यार्थिनी विशाखा हिने अतिशय



मधुर आवाजामध्ये स्वागत गीत म्हणून उपस्थित मान्यवरांचे स्वागत केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री आर्यन शिंदे जिल्हा समाज कल्याण अधिकारी जिल्हा परिषद बीड हे उपस्थित होते.

दिव्यांग व्यक्ती हक्क अधिकार अधिनियम २०१६ व दिव्यांगासाठी असणाऱ्या विविध योजनांची माहिती फुले यांनी दिली. तसेच दिव्यांग बंधू भगिनींना स्वावलंबी जीवन जगता यावे यासाठी वित्तीय सहायाच्या योजनांची माहिती श्री फुले यांनी दिली. श्री अशोक आठवले यांनी दिव्यांग दिन साजरा करण्यामागची कारण मीमांसा नमूद केली. दिव्यांग व्यक्तींचे मनोबल वाढविण्यासाठी सुहास पालीमकर यांनी छोटेखानी चित्र प्रदर्शन देखील भरवले होते. स्थानिक स्तर समितीचे सदस्य श्रीमान राजेंद्र लाड यांनी मार्गदर्शन पर भाषण केले. ३ डिसेंबर २०२३ हा जागतिक दिव्यांग दिन बीड जिल्ह्यामध्ये अतिशय उत्साहमय वातावरणामध्ये साजरा झाला. अध्यक्षीय भाषणामध्ये आर. एम. शिंदे यांनी दिव्यांगांना मदत करण्यासाठी मी कायम तत्पर असून कटीबद्ध असल्याचे मनोगत व्यक्त केले. अलोक कुलकर्णी मुख्याध्यापक, मूकबधिर विद्यालय बीड यांनी आभार प्रदर्शन करून कार्यक्रमाची सांगता केली.कार्यक्रमाचे प्रस्ताविक नखाते ए.बी. समाज कल्याण निरीक्षक, बीड यांनी केले.प्रमुख अतिथी म्हणून नंदकुमार फुले ,व्यवस्थापक ,महाराष्ट्र राज्य दिव्यांग आर्थिक विकास महामंडळ हे होते .तसेच दिव्यांग शासकीय कर्मचारी अधिकारी संघटना चे राज्य उपाध्यक्ष अशोक आठवले हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते

# 'त्यांची' नावे जाहीर केल्याशिवाय लोकांचा विश्वास बसणार नाही

## केलेल्या कारवाईची कागदपत्रे सार्वजनिक केल्याशिवाय जमणार नाही

बीड (प्रतिनिधी)

शहरातील एका नामवंत शाळेत अनैतिक लैंगिक संबंधांच्या काढण्यात आलेल्या अश्लील व्हिडिओ प्रकरणात सहभागी असलेले शिक्षक व शिक्षिकावर संस्थेकडून करण्यात येणाऱ्या कारवाईत दोषी शिक्षक व शिक्षिकांची नावे जाहीर केल्याशिवाय पालकांसह लोकांचाही विश्वास बसणार नाही तसेच कारवाईची कागदपत्रे सार्वजनिक केल्याशिवाय जमणार नाही. असे या शाळेत शिकणाऱ्या विद्यार्थी व विशेष करून विद्यार्थिनींच्या पालकांसह लोकांचे म्हणणे येत आहे म्हणून आता संस्थेच्या संचालक मंडळाने आडमुठेपणा व ताठरता सोडून आपल्या व्यवहारात थोडीशी का होईना लवचिकता आणावी. जेणेकरून या शाळेसह या संस्थेच्या सर्व शाळांमध्ये शिक्षण घेणारे एकूण १७ हजार विद्यार्थी व दोषी नसलेल्या जवळपास ६०० शिक्षकांचे वाटोळे होण्यापासून वाचेल. असे मुक्तपत्रकार एस.एम.युसूफ यांनी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकातून म्हटले आहे. याविषयी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकात नमूद केले आहे की, दोन महिन्यांपूर्वी सर्वसामान्य लोक या शाळेचे व संस्थेचे नाव घेतल्यानंतर अभिमानाने भरून यायचे. तिथे आता गेल्या दोन महिन्यांपासून या शाळेचे नाव घेतल्यावर पालकामध्ये रोष व राग उत्पन्न होऊ लागला आहे. याला कारणीभूत ठरला आहे एक बाईलवेडा शिक्षक आणि त्याच्या नादी लागून अनैतिक शारीरिक संबंध निर्माण करून त्याचे व्हिडिओ चित्रण करण्यात सामील असणाऱ्या काही व्यभिचारी शिक्षिका. या सर्वांमुळे तसेच चुकीच्या आडमुठे व ताठर भूमिका घेतलेल्या संस्थेच्या सचिवामुळे एका चांगल्या शाळेची नको तितकी बदनामी गल्लीपासून दिल्लीपर्यंत झाली आहे. एवढे सगळे घडल्यानंतर आता कुठे संस्थेच्या संचालक मंडळाने त्या बाईलवेड्या शिक्षकासह तीन शिक्षिकांना निलंबित केले तर दोन शिक्षिकांनी स्वेच्छा निवृत्ती घेतल्याचे सांगण्यात आले आहे परंतु अजूनही संस्थेचे संचालक मंडळ म्हणा किंवा सचिवांनी म्हणा कारवाई करण्यात आलेला तो बाईलवेडा शिक्षक सोडला तर इतर कोणत्याही शिक्षिकेचे नाव जाहीर केलेले नाही. यामुळे पालकांसह लोकांचाही संस्थेच्या संचालक मंडळावर विश्वास बसायला तयार नाही. हि बाब लक्षात घेता पालकांसह लोकांच्या मनात संस्थेबद्दल पुन्हा विश्वास निर्माण करण्यासाठी संस्थेच्या संचालक मंडळाने आडमुठेपणा व ताठरता सोडून आपल्या वर्तणुकीत थोडी का होईना लवचिकता आणून ज्या-ज्या शिक्षिकांवर निलंबनाची कारवाई केली जाईल किंवा ज्या-ज्या शिक्षिका स्वेच्छा निवृत्ती घेतील अशा सर्वांची नावे संचालक मंडळाकडून जाहीर होईपर्यंत लोकांचा विश्वास बसणार नाही तसेच केलेल्या कारवाईची कागदपत्रे सार्वजनिक केल्याशिवाय जमणार नाही असे पालकांसह लोकही मोठ्या प्रमाणात बोलू लागले आहेत. निदान आता तरी संस्थेच्या सर्व शाळा, १७ हजार विद्यार्थी आणि निर्दोष असलेल्या जवळपास ६०० शिक्षकांचा संस्थेच्या संचालक मंडळाने विचार करावा असे मुक्तपत्रकार एस.एम.युसूफ यांनी दिलेल्या प्रसिद्धीपत्रकात म्हटले आहे.



## गेवराई:-जेतवन बौध्द विहाराचे तात्काळ बांधकाम सुरु करण्यासाठी पॅथरचे म प्रदेश प्रवक्ते तथा बीड जिल्हाध्यक्ष धम्मपाल कांडेकर आक्रमक

### निवोदनाची दखल घ्यावी नसता पॅथर्स रिपब्लिकन पक्षाच्या वतिने आंदोलन छेडले जाईल असा ईशारा देत आहोत

गेवराई ।प्रतिनिधी

भिमनगर येथील जेतवन बौध्द विहार मोडकळीस आले होते ते पाडुन जवळपास महीना होत आला असुन ६ डिसेंबर रोजी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वान दिन असुन या ठिकाणी कॅन्डल मार्च असतो परंतु बौध्द विहाराचे कामच सुरु नसल्यामुळे आम्ही कार्यक्रम कुठे करायचा असा प्रश्न उपस्थीत होत आहे पुढे १४ एप्रिल रोजी महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकरांची जयंती सुध्दा जवळ आली आहे तरी मे मुख्याधिकारी साहेब यांनी आमच्या जेतवन बौध्द विहाराचे बांधकाम तात्काळ सुरु करावे अशी मागणी या पुर्वी सन २००८ पासुन शासन दरबारी पॅथरचे म प्रदेश प्रवक्ते तथा बीड जिल्हाध्यक्ष धम्मपाल कांडेकर हे करत आलेले आहेत ते आजतगायत गेवराई नगर परिषदेने जेतवन बौध्द विहाराला निधी मंजुर केला असुन मा नगराध्यक्ष सुशिलजी जवजाळ यांनी उध्दघाटन केले परंतु प्रत्याक्षात काम मात्र सुरु केले नाही याचा अर्थ काय समजायचा असा प्रश्न उपस्थीत होत आहे तरी मे साहेबांना विनंती करण्यात येते की आमच्या

१)जेतवन बोध्द विहाराचे तात्काळ बांधकाम सुरु करुन भव्यदिव्य बौध्द विहार बनवावे २) भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर चौक या ठिकाणी विद्यापीठासारखी कमान करण्यात यावी ३) बौध्द समाजाच्या स्मशानभुमीमध्ये भरपुर प्रमाणात झाडे आली असुन तेथे घाणीचे साम्राज्य झाले आहे ते तात्काळ साफसफाई करावे ४) बौध्द स्माशानभुमीच्या बाजुला असलेल्या स्वच्छालयामुळे त्या ठिकाणी घान वास दुर्गंधी नेहमी होते म्हनुन त्या ठिकाणा ऐवजी ईतरत्र नवीन स्वच्छालय बांधण्यात यावे जेणे करुन मयतीच्या वेळी त्या ठिकाणी समाज बांधवांना त्या ठिकाणी थांबता येईल

५)भिमनगर येथील बौध्द स्माशानभुमी येथे मयतीला आलेल्या बांधवांना बसन्याची व्यवस्था करावी अशी मागणी करत आहोत तरी या निवोदनाची दखल घ्यावी नसता पॅथर्स रिपब्लिकन पक्षाच्या वतिने आंदोलन छेडले जाईल असा ईशारा देत आहोत

# मराठ्यांना नडू नका, तुमच्या आश्वासनाच्या क्लीप व्हायरल करू

## मनोज जरांगेंचा थेट गिरीश महाजनांना इशारा

प्रतिनिधी । बुलढाणा

मराठा समाजाला सरसकट कुणबी प्रमाणपत्र देता येणार नाहीत, ज्यांच्या नोंदी त्यांनाच प्रमाणपत्र मिळणार असे वक्तव्य मंत्री गिरीश महाजन यांनी केले आहे. गिरीश महाजन यांच्या वक्तव्यानंतर मनोज जरांगेनी महाजनांवर निशाणा सधला आहे. गिरीश महाजनांनी चुकीचे वक्तव्ये करू नयेत. त्यांनी दिलेल्या आश्वासनांच्या रेकॉर्डिंग आमच्याकडे आहे. एवढ्या मोठ्या उंचीच्या नेत्याने भरकटल्यासारखी वक्तव्ये करू नये. विनाकारण मराठ्यांना नडू नका, अन्यथा त्यांच्या आश्वासनाच्या क्लिप राज्यभर व्हायरल करू, असा थेट इशारा जरांगेंनी महाजनांना दिला आहे. ते बुलढाण्यात बोलत होते.

मनोज जरांगे म्हणाले, पश्चिम महाराष्ट्रातील आणि खानदेशातील मराठे एकत्र येत नाही असे म्हटले जायचे पण सभेची गर्दी पाहून तुमच्या लक्षात येईल. गिरीश महाजनांनी विचार करावा आणि नंतर वक्तव्ये करावीत. त्यांनी आपल्या मागणी पूर्ण करण्यासाठी वेळ मागितला होता. त्यानंतर त्यांना आपण वेळ दिला होता. आमच्याकडे त्यांनी दिलेल्या आश्वासनाचे अनेक पुरावे आहेत. चुकीची वक्तव्ये करून समाजाची दिशाभूल करू नका. अन्यथा आम्ही त्यांच्या आश्वासनाच्या क्लिप राज्यभर व्हायरल करु.

# आंबेडकर घराणं आमची अस्मिता.इतर राजकीय लोकांनी औकातीत राहून भाष्य करावे-डॉ जितीन वंजारे

बीड ।प्रतिनिधी

राजकारणामध्ये राजकीय नेत्यांचा स्तर खालावत आहे,एकमेकांना रोध-प्रतिरोध करण्यासाठी वेगवेगळ्या युक्त्या केल्या जातात, कटकारस्थाने केली जातात.कोणी कोणावर टीका करून प्रसिद्ध होण्याचा प्रयत्न करत आहे, तर कोणी आपल्यापेक्षा श्रेष्ठ कोणीच नाही अशा पद्धतीची वल्गना करत आहे.परंतु तुमचा राजकीय दृष्टिकोन तुम्ही बाजूला ठेवा, आमच्या तमाम बहुजन समाजासाठी महामानव,विश्वरत्न, बोधीसत्व डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांचे वंशज म्हणजेच आंबेडकर घराणे आणि आदरणीय बाळासाहेब आंबेडकर हे आमची अस्मिता असून आदरणीय बाळासाहेब आंबेडकर यांच्या विषयी भाष्य करताना इतर राजकीय नेत्यांनी औकातीत राहून भाष्य करावे,नसतं आंबेडकरी समाज कोणत्याही पैसे खाऊन टीका करणाऱ्या राजकीय नेत्याला रस्त्यावर फिरू देणार नाही त्यांची जागा त्यांना दाखवून देऊ असा इशारा सामाजिक कार्यकर्ते तथा कट्टर भीमसैनिक डॉक्टर जितीनदादा वंजारे खालापूरीकर यांनी केला आहे.

स्वतःच्या हितासाठी हजार पक्ष बदलणाऱ्याने,दारू पिऊन कोंबडी चोरून पिठमाग्या दिडफुट्याने कोणाची तरी सुपारी घेऊन आदरणीय बाळासाहेब आंबेडकर यांच्यावर टीका करू नये. आत्ताच काही दिवसापूर्वी आदरणीय बाळासाहेब आंबेडकर यांना अटक करा म्हणून एका कथित व्यक्तीने भाष्य केले.त्या व्यक्तीला माझे सांगणे आहे की त्याने अगोदर स्वतःची राजकीय पद, प्रतिष्ठा,वय,सामाजिक पोझिशन ओळखून घ्यावी कारण स्वतःच्या स्वार्थासाठी कार्यकर्त्याचा जराही विचार न करणारे भुरटे नेते आदरणीय बाळासाहेब आंबेडकर यांच्याविषयी गरळ ओकत आहेत.काही पक्षांचे तर काही भुंकनारे कुत्रे ठेवले आहेत ते घरादारासह दुसऱ्यावर टीका टिपण्णी करत आहेत आणि त्याबदल्यात त्यांना किंचित शुक्षम् मंत्रिपद,आमदारकी आणि खासदारकी मिळत आहे अश्या सूपारीबाज राजकीय दलालांनी देशातील एकमेव स्वाभिमानी नेते आदरणीय प्रकाश आंबेडकर यांच्यावर खालच्या पातळीवर जाऊन टीका टिपण्णी करू नये. बाळासाहेबांना अटक करण्याचे बोल बोलून स्वतःची मी लय मोठा दलाल अशी पदवी बडवून घेऊ नये. औकतीत राहून टीका टिप्पणी करावी नसता गाठ आंबेडकरी जनतेशी आहे लक्षात ठेवा .नादी लागाल तर घराबाहेर पाडण्याचे वांदे होतील असा इशारा भीमसैनिक तथा सामाजिक कार्यकर्ते डॉ जितीन वंजारे यांनी दिला आहे.अननपड आणि आखूड बुद्धीच्या नेत्यांनी आदरणिय बाळासाहेब आंबेडकर यांच्यावर खालच्या पातळीची टीका करून स्वतः खुप मोठा असल्याचा आव आणू नये.कोणीतरी आत्ता बेताल वक्तव्य केलं त्या वक्तव्याचा मी जाहीर निषेध करतो राजगृह आणि आंबेडकर घराणं हे बहुजन समाजासाठी अनमोल असून आमच्या अस्मितेला धक्का लावण्याचा प्रयत्न येथील लायकी नसणाऱ्या कोणत्याच राजकारण्याने करू नये आणि तसा जर प्रयत्न कोणाकडून घडत असेल तर तो भीमसैनिक म्हणून आम्ही कदापिही सहन करणार नाहीत बाळासाहेब आंबेडकर यांनी ठरवलं



तर एका मिनिटांमध्ये खासदारकी आमदारकी मंत्री पद किंवा इतर कोणतेही पदे ते मिळू शकतात त्यांच्यामध्ये तेवढी राजकीय उंची असून त्यांचे आजोबा महामानव विश्वरत्न बोधिसत्व भारतीय घटनेचे शिल्पकार डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या नुसत्या नावाने आणि रक्ताचा वंशज म्हणून आदरणीय बाळासाहेब आंबेडकर यांना कोणतेही राजकीय पद मिळू शकते. परंतु केवळ आणि केवळ बहुजनांच्या हितासाठी शोषित पीडित मागासवर्गीसाठी सामाजिक लढा उभा करण्यासाठी महामानव डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी लिहिलेल्या संविधानाच्या रक्षणासाठी बाळासाहेब आंबेडकर रस्त्यावरची लढाई लढत आहेत. बाळासाहेब आंबेडकर हे बॅरिस्टर असून मोठे कायदे तज्ञ आहेत वयाची अनेक वर्ष त्यांनी वकीलकी व्यवसायामध्ये निपुण असे कार्य केले आहे अशा या ज्ञानवंत, कायद्याची इत्यंभूत माहिती असणाऱ्या राजकारणाची आणि राज्यकर्त्यांची व राजकीय नेत्यांची चांगलीच ओळख असणाऱ्या आदरणीय बाळासाहेब आंबेडकर यांनी दिलेल्या स्टेटमेंट वर कोणीतरी फडतूस राजकीय उड्या मारणाऱ्यानी स्वतःची औकात 'थाळी मे बैगन' सारखी परिस्थिती असणार्या कमी उंचीच्या लोकांनी आदरणिय बाळासाहेब आबेडकर यांच्यावर जहरी टीका करू नये.सामाजिक वाद लावून राजकीय पोळी भाजून पक्षाची गुलामी आणि दलालीचे प्रदर्शन करू नये , नसता बाळासाहेबांना अटक करण्याची भाषा वापरू नये बाळासाहेब आंबेडकर हे भारत देशाचे स्वाभिमानी नेते असून बाळासाहेबांना बहुजन हृदय सम्राट असे म्हणले जाते. कारण गोरगरीब शोषित पीडित दलितांच्या अत्याचारासाठी अहोरात्र काम करणाऱ्या बाळासाहेब आंबेडकर यांना चॅलेंज देणाऱ्या सूक्ष्म आणि लघुत्तम लोकांनी उंचीनुसार बोलावे त्यांनी स्वतःची राजकीय पद कितपत आहे, आपण किती पक्ष बदलले आहेत.आपली औकात बघून बोलावे.आदरणीय बाळासाहेब आंबेडकर यांची जाहीर माफी मागावी आणि सामाजिक वाद थांबवावा. शांततामय चाललेल्या महाराष्ट्रामध्ये थोड्याफार बोल घेवड्या लोकांमुळे शांतता आणि सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होत आहे त्यामुळे अशी वक्तव्य करणाऱ्या आणि जातीजातीमध्ये वाद निर्माण करणाऱ्या नेत्याला वेळीच चोप दिला पाहिजे.नसता जातीपातीमध्ये भांडण लावून सत्तेवरती बसण्याचा क्रूर कुटील डाव काही नेत्याचा फार वर्षापासून चालू आहे.भारत देशाचा एक सुजाण नागरिक म्हणून आपण हाणून पाडला पाहिजे आणि या भारतामध्ये जोपर्यंत चंद्र सूर्य आहे तोपर्यंत महामानव विश्वरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर आणि यांचे संविधान कोणीही मायका लाल बदलू शकत नाही. त्यामुळे संविधान रक्षक आदरणीय बाळासाहेब आंबेडकर यांच्या विषयी इतर कोणत्याही राजकीय व्यक्तीने उठ सूट प्रसिद्धीसाठी खालच्या दर्जाची टीका टिपण्णी करू नये नसता त्यांना त्यांची जागा दाखवली जाईल असा इशारा सामाजिक कार्यकर्ते तथा कट्टर भीमसैनिक डॉक्टर जितीनदादा वंजारे खालापूरीकर यांनी दिला आहे.

# राष्ट्रीय अबॅकस स्पर्धेत गेवराईच्या वैष्णवी पिंपरकरचे घवघवीत यश

गेवराई ।प्रतिनिधी

हैद्राबाद येथे २० व्या राष्ट्रीय अबॅकस स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत एस.आय.पी.अबॅकस कॅडमी, गेवराई येथील विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला होता. यामध्ये गेवराईच्या कु.वैष्णवी नारायण पिंपरकर हिने तिसऱ्या क्रमांकाचा उपविजेता पुरस्कार मिळवून घवघवीत यश संपादन केले आहे. तिच्या यशाबद्दल तिचे सर्वत्र कौतुक होवून सर्वच स्तरातून अभिनंदन केले जात आहे दि. २६ नोव्हेंबर २०२३ रोजी हैदराबाद येथे राष्ट्रीय अबॅकस स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत राज्यभरातील विविध भागातील हजारो विद्यार्थ्यांनी सहभाग



नोंदवला होता. यामध्ये गेवराईच्या कु.वैष्णवी नारायण पिंपरकर हिने तिसऱ्या क्रमांकाचा उपविजेता पुरस्कार मिळवून घवघवीत यश संपादन केले आहे. वैष्णवीला कांचन पंडित, रोहिनी ढाकणे, विद्या देशपांडे यांनी मार्गदर्शन केले. या स्पर्धेत संपूर्ण भारतातून जवळपास पाच हजार विदयार्थ्यांनी सहभाग नोंदवला होता. या यशाबद्दल वैष्णवीचे व तिला मार्गदर्शन करणाऱ्या शिक्षिकाचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.



**प्रतिनिधी । पैठण**

पैठण : जायकवाडी धरणाच्या पायथ्याशी १२ मेगावॅट वीजनिर्मितीचा वीज प्रकल्प मागील २ वर्षांपासून वेगवेगळ्या कारणांसह तांत्रिक बिघाडांमुळे बंद होता. आता त्याची दुरुस्ती केली असून मंगळवारी (५ डिसेंबर) हा प्रकल्प सुरू होणार असल्याची माहिती वीज प्रकल्पाचे अभियंता सोनी यांनी दिली.

या वीज केंद्रात निर्माण होणारी वीज पैठणसह महाराष्ट्रभरात पुरवली जाते. जायकवाडी धरणाच्या निर्मितीनंतर या १२ मेगावॅट वीज केंद्राची निर्मिती सन १९८४/८५ मध्ये करण्यात आली होती. वर्षाकाठी या वीज केंद्रातून राज्यभरातील विजेमध्ये साधारणपणे ३४९०००० युनिटची भर पडते. मात्र, मागील दोन वर्षांपासून हे वीज केंद्र कोणत्या ना कोणत्या तांत्रिक कारणाने बंद पडले होते. आता ते मंगळवारपासून सुरू होणार आहे.

अडथळा झाला आता दूर

पाटबंधारे विभागाने चेनकवाडी बंधाऱ्याचे गेट्स बंद केले नसल्यानेही वीजनिर्मिती ठप्प होती. आता हे गेट्स बंद केले आहेत. त्यामुळे वीज केंद्र सुरू होणार आहे.

नदीत सोडलेले पाणी पुन्हा आणता येते धरणातया १२ मेगावॅट वीजनिर्मिती केंद्रात जपानी बनावटीचे रिव्हर्सिबल टर्बाइन आहे.

# प्रकाश आंबेडकरांची संत वामन भाऊंच्या समाधीला भेट

## महंत विठ्ठल महाराज यांच्याशी तीन तास बंद दाराआड चर्चा

**प्रतिनिधी । बीड**



बीड : वंचित बहुजन आघाडीचे संस्थापक अध्यक्ष ड. प्रकाश आंबेडकर आणि श्रीक्षेत्र गहीनाथ गडाचे महंत विठ्ठल महाराज यांच्यात गुरुवारी दुपारी तब्बल तीन तास बंद दाराआड चर्चा झाली. दरम्यान, संत वामन भाऊंच्या समाधीचे नतमस्तक होऊन दर्शन घेतल्यानंतर प्रकाश आंबेडकर यांनी गडाच्या वतीने स्नेहभोजनही स्वीकारले.

अचानक झालेल्या या प्रदीर्घ भेटीची चर्चा मात्र यावेळी या परिसरात चर्चेचा विषय ठरली. वंचित बहुजन आघाडीच्या माध्यमातून राज्यभर संघर्ष करणारे बाळासाहेब आंबेडकर आज दुपारी निवांत दिसले. त्यांनी अचानक बीड जिल्ह्याच्या पाटोदा तालुक्यातील श्रीक्षेत्र गहीनाथ गडावर दुपारच्या वेळी महन्त विठ्ठल महाराज यांच्याशी बंद दाराआड मुक्त संवाद साधला. दरम्यान, कोणत्या विषयावर चर्चा झाली या संदर्भात अधिकृत माहिती प्राप्त झाली नसली तरी राजकीय, सामाजिक, धार्मिक विषयावर चर्चा झाल्याचे सूत्रांनी सांगितले.एक वर्षावर लोकसभा आणि विधानसभेच्या निवडणुका आल्या आहेत. राजकीय नेते राज्यभराच्या वेगवेगळ्या भागात कार्यकर्त्यांशी चर्चा आणि संवाद साधत आहेत. आज गुरुवारी प्रकाश आंबेडकर यांनी अचानक संत वामनभाऊ महाराजांच्या पदस्पर्शाने पुनीत हा गड राज्य आणि देशभराच्या धार्मिक नकाशावर आहे. लाखो भक्त येथे पुण्यतिथीला येतात. पुण्यतिथी जानेवारी महिन्यात असल्याने बाळासाहेब आंबेडकर यांना आमंत्रणही दिले जाऊ शकते अशी चर्चा यावेळी दिसून आली.

एकूणच, प्रकाश आंबेडकर आणि महंत विठ्ठल महाराज यांच्यामध्ये तब्बल दोन तासाहून अधिक बंदरात चर्चेत कोणते विषय हाताळले गेले? यासंदर्भात तालुका आणि जिल्हा भर चर्चेला उधाण आले आहे. यावेळी त्यांच्यासमवेत वंचित बहुजन आघाडीचे राज्य उपाध्यक्ष प्रा.किसन चव्हाण सर,तक्रार निवारण समितीचे राज्य अध्यक्ष प्रा. विष्णू जाधव सर, जिल्हाध्यक्ष उद्धव खाडे ,तालुका अध्यक्ष बाळासाहेब गायकवाड सचिन मेघ डंबर ,शामसुंदर वाघमारे, सुभाष सोनवणे, राहुल सोनवणे. विविध पदाधिकारी उपस्थित होते.

### राज्यात दंगल घडू शकते

डिसेंबरमध्ये राज्यात दंगल घडू शकते असं सांगत प्रकाश आंबेडकर म्हणाले की, राज्यात अनेक ठिकाणी दंगलग्रस्त परिस्थिती आहे. प्रत्येक पोलीस स्टेशनला सतर्क करण्यात आले आहे. कुठल्याही परिस्थितीत ६ डिसेंबरनंतर काहीही घडू शकते. चार राज्याच्या निवडणुका झाल्यानंतर घडेल. मुस्लिम आणि ओबीसी आरक्षण टार्गेट केलं जात आहे. समाजात अशांतता पसरवली जाते आहे. आंदोलनाशी संबंध नसलेल्यांचा वापर केला जात आहे.

## रुग्णालयांतील अग्निरोधक यंत्रणा साठी निधी द्यावा

# शासन धोरणाच्या निषेधार्थ 'अग्निरोधक यंत्रणेला' श्रद्धांजली आंदोलनः- डॉ.गणेश ढवळे




बीड।प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील जिल्हा रुग्णालयासह अधिनस्थ इतर १७ अशा एकुण १८ आरोग्य संस्थांच्या इमारतीमध्ये तातडीने अग्निरोधक यंत्रणा उभारण्यात यावी यासाठी तातडीने निधी द्यावा.२०२१ मध्ये भंडारा आणि अहमदनगर येथील जिल्हा रुग्णालयात लागलेल्या आगीत नवजात बालक आणि रूग्णांचा मृत्यू झाल्यानंतर शासकीय रुग्णालयातील इमारतींमध्ये अग्निरोधक यंत्रणा उभारण्यात यावी हा विषय ऐरणीवर आला होता. यानंतर निवेदन तसेच आंदोलनानंतर अग्निरोधक यंत्रणा उभारण्यासाठी शासनाने अंदाजपत्रके मागवली होती.त्याअनुषंगाने जिल्हा प्रशासनाने २४ कोटी ३९ लाख रुपयांची अंदाजपत्रके पाठवुन २ वर्षे उलटूनही अद्याप निधी न देण्याच्या शासनाच्या संवेदनहीनता धोरणाच्या निषेधार्थ सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती आधिकार कार्यकर्ता महासंघ डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांच्या नेतृत्वाखाली आज दि.४ डिसेंबर सोमवार रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर अग्निरोधक यंत्रणेला श्रद्धांजलीवाहुन शासनाचे लक्ष्य वेधण्यासाठी आंदोलन करण्यात येऊन जिल्हाधिकारी , जिल्हा शल्यचिकित्सक बीड यांच्या मार्फत मुख्यमंत्री, प्रधान सचिव, आरोग्यमंत्री, सचिव सार्वजनिक आरोग्य विभाग मंत्रालय मुंबई यांना निवेदन देण्यात आले.यावेळी आंदोलनात बीड शहरप्रमुख माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ शेख युनुस , सुदाम तांदळे,मुबीन शेख,शिवशर्मा शेलार, बाळासाहेब मुळे, धनंजय सानप आदि सहभागी होते.जानेवारी २०२१ मध्ये भंडारा जिल्हा रुग्णालयातील ईमारतीला आग लागली.अग्निरोधक यंत्रणा नसल्याने रौद्ररूप धारण केलेल्या आगीने बालकांच्या अतिदक्षता विभागातील ११ नवजात बालके मृत्युमुखी पडली होती.त्यानंतर १० महिन्यांनी नोव्हेंबर २०२१ मध्ये अहमदनगर जिल्हा रुग्णालयात अशीच घटना घडली यात १० रूग्णांचा होरपळुन मृत्यू झाला होता.मात्र यातुन कोणताही धडा घेतल्याचे दिसून येत नाही.२ वर्षे उलटूनही अद्याप अग्निरोधक यंत्रणा साठी निधी देण्यात आलाच नाही.

नागरीकांच्या जीवन मरणाचा प्रश्न असणा-या आरोग्य विषयक सुविधा उदाहरणार्थ जिल्हा रुग्णालयात एमआरआय तसेच कार्डियाक कॅथलॅब सुविधा तसेच जिल्हा रुग्णालयाच्या आवारातील राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान अंतर्गत माता व बाल रूग्णालयासाठी २०० खाटांची स्वतंत्र इमारत मंजूर होऊन त्याचे काम सुद्धा पुर्ण झालेले आहे.मात्र विद्युतीकरण आणि लिफ्ट साठी ३ कोटी रुपयांच्या निधीच्या कमतरतेमुळे ८ महिन्यांपासून ईमारत धुळखात पडुन असुन जिल्हा रुग्णालयातील स्त्रीरोग विभागात खाटा कमी पडत असल्याने नवजात बालक व नवमातांची तारांबळ उडत आहे.मात्र त्यासाठी निधी देण्यासाठी हात आखडता घेणारे शासन स्वतःची जाहिरात करण्यासाठी कोट्यवधी रुपयांची उधळपट्टी शासन आपल्या दारीकार्यक्रमाच्या माध्यमातून करताना दिसत आहे.

# विद्यार्थ्यांमध्ये समाज बदलाचे सामर्थ्य - प्रकाश उजगरे

## परिववर्तनाचे शिलेदार विद्यार्थी संघटनेची राज्य कार्यकारणी जाहीर







बीड ।प्रतिनिधी

मागील काही वर्षापासून परिवर्तनाचे शिलेदार या विद्यार्थी संघटनेने महाराष्ट्रामध्ये विद्यार्थ्यांच्या न्याय हक्कासाठी लढा गतिमान केला आहे. यातून विद्यार्थ्याच्या विविध मागण्यासाठी आग्रही भूमिका घेऊन विद्यार्थ्यांच्या कलागुनाला व्यासपीठ निर्माण करून देऊन विद्यार्थ्यांमध्ये समाज बदलाचे सामर्थ्य निर्माण करण्याचा उद्देश संघटनेचा असल्याचे प्रतिपादन संस्थापक अध्यक्ष प्रकाश उजगरे यांनी केले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ येथे आयोजित विद्यार्थ्यांच्या राज्यव्यापी बैठकीमध्ये परिवर्तनाचे शिलेदार या विद्यार्थी संघटनेची राज्य कार्यकारणी नुकतीच जाहीर करण्यात आली. या प्रसंगी प्रकाश उजगरे बोलत होते. मागील सात आठ वर्षापासून राज्यासह देशातील विद्यार्थ्यांचे, शेतकऱ्याचे आंदोलने चिरडण्याचे काम झाल्याचा इतिहास आहे. हा देश शेतकऱ्यांच्या आणि विद्यार्थ्यांच्या कष्टावर उभा आहे. या देशाला मजबूत करायचे असेल तर शेतकऱ्याला आणि विद्यार्थ्याला मजबूत केले पाहिजे हा उद्देश समोर ठेवून परिवर्तनाचे शिलेदार या संघटनेची स्थापना करण्यात आली असल्याचे प्रकाश उजगरे यांनी यावेळी सांगितले. विद्यार्थ्यांच्या कलागुणांना न्याय देण्यासाठी संपूर्ण महाराष्ट्रामध्ये घटना कार्य करीत आहे. संघटनेचा विस्तार करण्यासाठी प्रथमच महाराष्ट्र राज्य कार्यकारणी जाहीर करण्यात आली आहे. नव्या जिद्दीने आणि जोशाने संघटनेचा महाराष्ट्रात विस्तार करण्याचा निर्धार विद्यार्थ्यांनी केलेला आहे. दरम्यान हाच निर्धार मनाशी बाळगून बैठकीत महाराष्ट्र राज्य प्रदेश कार्यकारणी जाहीर करण्यात आली आहे. यामध्ये महाराष्ट्राच्या सर्व विभागातून विद्यार्थ्यांसाठी कार्य करण्याची आवड असणाऱ्या विद्यार्थ्यांना संधी देण्यात आली आहे.विद्यार्थ्यांचे अनेक प्रश्न महाविद्यालयीन स्तरापासून मंत्रालयापर्यंत या शिलेदारच्या माध्यमातून उचलून विद्यार्थ्यांना न्याय मिळवून देण्याचे कार्य झालेले आहे. त्यासोबतच वेगवेगळ्या स्पर्धा घेऊन विद्यार्थ्यांमधील कौशल्य विकसिकसित करण्याचे कार्य परिवर्तनाचे शिलेदारने केले आहे.परिवर्तनाचे शिलेदार राज्य कार्यकारिणीमध्ये परभणीच्या सिध्दार्थ पानबुडे यांची महाराष्ट्र राज्य अध्यक्षपदी सर्वानुमते निवड करण्यात आली तर उपाध्यक्ष आकाश खंदारे, सचिव संघर्ष गायकवाड, महासचिव ड. दशरथ वाळके, संघटक प्रवीण वाव्हळ, प्रवक्ता सतीश अंभोरे, विधी सल्लागार ड. अशोक वाघमारे, ड. प्रियंका मगरे, स्टार प्रचारक दिक्षा पवार, सदस्य संतोष शिरसाट अशी राज्य कार्यकारणी निवडण्याचे परिवर्तनाचे शिलेदारचे संस्थापक अध्यक्ष प्रकाश उजगरे यांनी जाहीर केले डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ येथे पार पडलेल्या या बैठकीत राज्यभरातून मोठ्या प्रमाणावर विद्यार्थी सहभागी झाले होते. छत्रपती शिवाजी महाराज, राजश्री शाहू महाराज, महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारधारेतून पुढील काळात परिवर्तनाचे शिलेदार च्या , माध्यमातून महाराष्ट्रातील तळागाळातील विद्यार्थ्यांच्या न्याय व हक्कासाठी विद्यार्थ्यांमधील कला, क्रीडा, कौशल्य आणि सांस्कृतिक गोष्टींना चालना देण्यासाठी कार्य करतील व विद्यार्थी वर्गाला अभिमान वाटेल असे कार्य या सर्व पदाधिकाऱ्यांच्या हातून घडेल, असा विश्वास संस्थापक अध्यक्ष प्रकाश उजगरे यांनी व्यक्त केला.




उप-जिल्हा रुग्णालय परळी-वैद्यनाथ येथे होतोय . रुग्णवाहीकेला त्रास टु-व्हीलर पार्किंग नसल्यामुळे रुग्णवाहीकेला पेशंट घेऊन येता वेळेस अर्धा- अर्धा तास गाड्या काढायची पाहावा लागते वाट , रुग्णवाहिका च्या ड्रायव्हर ला स्वत: काढावा लागतात गाड्या , सिक्युरिटी बोलतात आम्ही काय करावा आयकत नाहीत लोक .

## खापरवाडी ग्रामपंचायत च्या युवा उपसरपंच पदी ऋषिकेश पटाईत यांची बिनविरोध निवड

पदाच्या माध्यमातून ग्रामस्थांचे प्रश्न सोडविणार ऋषिकेश पटाईत



वडवणी ।अंकुश गवळी

वडवणी तालुक्यातील मौजे खापरवाडी / रत्नापुर येथील ग्रामपंचायत निवडणूक प्रक्रिया अगदी खेळी मेळीच्या वातावरणात पार पडली.यावेळी सरपंच पदी बजरंग खेमा चव्हाण यांची निवड झाली आहे.. व तसेच युवा उपसरपंच पदी ऋषिकेश नवनाथ पटाईत यांची खेळीमेळीच्या वातावरणात बिनविरोध निवड पार पडली या प्रसंगी प्रसार माध्यम समोर बोलताना आपले मत व्यक्त केले... गावच्या विकासासाठी अहोरात्र प्रयत्न करणार व गावातील विकास कामे मोठ्या प्रमाणात आणणार व गावच्या विकासासाठी जोमाने कामे करणार सर्वांच्या मार्गदर्शन ने जेष्ठ यांच्या वतीने कामे मोठ्या प्रमाणात करणार आहे, याप्रसंगी गावातील युवक नागरिक ग्रामस्थ गावातील आजी-माजी सरपंच उपस्थित होते.

# वसंतदादा पाटील महाविद्यालयात जागतिक एड्स दिन साजरा

प्रतिनिधी / पाटोदा

येथील नवगण शिक्षण संस्था संचालित वसंतदादा पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात जागतिक एड्स दिन उत्साहात साजरा करण्यात आला. महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभाग व आरोग्य समितीमार्फत आयोजित या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य प्रोफेसर आबासाहेब हांगे होते. व्यासपीठावर उपप्राचार्य डॉ. गणेश पाचकोरे, डॉ. अभय क्षीरसागर, पदव्युत्तर विभाग संचालक डॉ. ज्ञानेश्वर चौधरी, कनिष्ठ विभागाचे उपप्राचार्य प्रा. नामदेव चांगण, पर्यवेक्षक प्रा. अनिल जोगदंड, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी प्रोफेसर प्रशांत पाटील उपस्थित होते.कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रोफेसर प्रशांत पाटील यांनी केले. प्रास्ताविकात त्यांनी एड्स रोगाविषयी थोडक्यात माहिती देत एड्स जनजागरणाचे महत्व विषद केले.अध्यक्षीय समारोपात प्राचार्य प्रोफेसर आबासाहेब हांगे म्हणाले की, गेल्या दोन दशकात वैद्यकीय क्षेत्रात झालेल्या प्रगतीमुळे आपण एड्स सारख्या जीवघेण्या आजारावर मात केलेली आहे. आज एड्समुळे मृत्यूचे प्रमाण फार कमी झालेले आहे. एड्सग्रस्त लोकांना समाजातून सन्मानाची वागणूक दिली जात आहे.

# प्रा.डॉ.राणी जाधव-गायकवाड यांच्या प्रियदर्शी वाचनालयाच्या वतीने चित्रकला स्पर्धेचे बक्षीस वितरण

## प्रा. डॉ राणी जाधव यांचा स्तुत्य उपक्रम

प्रतिनिधी ।बीड

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या शाळा प्रवेश दिनानिमित्त प्रा. डॉ. राणी जाधव - गायकवाड व प्रा.अशोक गायकवाड यांच्या प्रियदर्शी मोफत वाचनालयाच्या वतीने सहभागी मुलांना चित्रकला साहित्याचे वाटप करून महामानवांचे चित्र या विषयावर चित्रकला स्पर्धा आयोजित केली होती. त्याचा बक्षीस वितरण कार्यक्रम नागसेन बुद्ध विहार, बीड या ठिकाणी नुकताच मोठ्या हर्ष उल्हासाहात संपन्न झाला.

या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून, जनसूर्यचे संपादक तथा पद्मपाणी प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष आयु.दिलीपराव तरकसे व प्रा.व्ही आर गाडे होते. तर कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान ऍड. के.आर गाडे यांनी भूषवले.सर्व प्रथम मान्यवरांच्या हस्ते तथागत गौतम बुद्ध व विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांचे पूजन करण्यात आले.



यानंतर कार्यक्रमाच्या आयोजक तथा प्रियदर्शी वाचनालयाच्या संचालिका प्रा.डॉ.राणी जाधव-गायकवाड यांनी कार्यक्रमाच्या प्रास्ताविकेत स्पर्धेच्या आयोजनाची भूमिका स्पष्ट केली. यावेळी त्या म्हणाल्या की, आम्ही ही स्पर्धा मुलांच्या सुप्त कला गुणांना वाव मिळण्यासाठी व या निमित्ताने मुलांनी विविध महामानव व महामातांचे जीवन चरीत्र वाचून ज्ञान समृद्ध व्हावे.या उद्देशाने ही चित्रकला स्पर्धा आयोजित केली होती. या स्पर्धे मध्ये मुलांनी उत्स्फूर्तपणे प्रतिसाद देत, दिलेल्या विषयावर उत्कृष्ट चित्रे रेखाटली होती. या कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी म्हणून बोलताना आयु. दिलीप तरकसे यांनी असे प्रतिपादन केले की या चित्रकला स्पर्धेचे आयोजन ७ नोव्हेंबर म्हणजे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या शाळा प्रवेश दिनाचे औचित्य साधून करण्यात आले होते. या मागे एक उदात्त हेतू आहे. ज्याप्रमाणे डॉ.बाबासाहेबांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत ज्ञानार्जन करून भारतातच नव्हे तर विश्वामध्ये ज्ञानाचे प्रतीक म्हणून आपले स्थान निर्माण केले . अशा महामानवाच्या शाळा प्रवेश दीना निमित्ताने देशाचे भावी आधारस्तंभ म्हणजे आजच्या मुली आणि मुले यांनी कांहीतरी प्रेरणा घेऊन आपले समाजात उच्च स्थान निर्माण करावे. राहणीमान साधी असली तरी, मुलांनी आपली नीतिमत्ता आणि गुणवत्ता टिकवून आपले शैक्षणिक प्रगती करून व्यक्तिमत्व विकास साधावा.यावेळी व्ही.आर गाडे यांनी गायकवाड दांपत्य हे सावित्रीमाई आणि ज्योतिबा फुले यांच्या कार्याचा वारसा पुढे चालवत आहेत .असे नमूद करून त्यांच्या कार्याला शुभेच्छा दिल्या.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षीय समारोपात ऍड.मा.के. आर गाडे यांनी यांनी असे प्रतिपादन केले की, दान पारमिता धम्माचा अविभाज्य घटक आहे परंतु सध्या समाजामध्ये या दान पारमिताचे पालन करणाऱ्या लोकांची संख्या अत्यंत अल्प आहे. प्रा.अशोक गायकवाड व प्रा.डॉ. राणी जाधव - गायकवाड हे दांपत्य वेळोवेळी विविध उपक्रमाच्या माध्यमातून गरजवंताना मदत करून समाजोपयोगी कार्य करत आहेत. त्यांच्या या उपक्रमांना समाजातील लोकांनी प्रोत्साहन देऊन त्यांना प्रेरणा दिली पाहिजे. प्रियदर्शी वाचनालयाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या चित्रकला स्पर्धेच्या निमित्ताने मुलांनी जी चित्रे रेखाटली आहेत ती अत्यंत उत्तम दर्जाची आहेत. या मुलामध्ये उद्याचे जगविख्यात चित्रकार दिसत आहेत.या चित्रकला स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांक चि.यश वाघमारे, द्वितीय क्रमांक कु. ऋतुजा चव्हाण तर तृतीय क्रमांक चि. यश शिनगारे यांनी पटकावला त्यांना या प्रसंगी मान्यवरांच्या हस्ते बक्षीस पात्र मुलांना बक्षिस देऊन गौरविण्यात आले.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आयु. यू. एस वाघमारे सेवानिवृत्त वरिष्ठ अधिकारी एल.आ.यसी तर आभार प्रदर्शन प्रा. अशोक गायकवाड यांनी केले.

या कार्यकमासाठी सेवानिवृत्त पोलीस निरीक्षक तानाजी शिनगारे, सुधाकर वाघमारे, प्रा बी. बी सिरसाट,के. बी गायकवाड,श्रीरंग डोळस,डोळस ताई एड. डी.एम विद्यागर,परिसरातील बहुसंख्य उपससक उपासिका उपस्थित होत्या .



पाटोदा तहसीलदारपदी आपल्या तालुक्याचे भूमिपुत्र मा. संतोषजी बन यांची निवड झाल्याबद्दल त्यांना शुभेच्छा दिल्या



लोकसभा निवडणूक महा विजय२०२४ चे सोशल मीडियाचे प्रदेश संयोजक मा प्रकाश गाडे यांनी केज विधानसभेची आढावा बैठक घेतली यावेळी ज्येष्ठ नेते नंदकिशोर मुंदडा काकाजी मराठवाडा संयोजक साईनाथ शिरपुरे, जिल्हा संयोजक अमोल वडतुले, विधानसभेचे युवा नेते अक्षय भैय्या मुंदडा ,केज भाजपाचे अध्यक्ष भगवान केदार, अंबाजोगाई तालुका अध्यक्ष अच्युत गंगणे ,यांच्यासह केज व अंबाजोगाई तालुक्याचे सोशल मीडियाचे प्रमुख व टीम उपस्थित होती.

# तीन राज्यातील धवधवीत यश हे आगामी लोकसभा विजयाची नांदी पंतप्रधान मोदी यांच्या कर्तृत्वाचा करिष्मा -आ.भीमराव धोंडे

आष्टी ।प्रतिनिधी

मध्यप्रदेश, राजस्थान आणि छत्तीसगड या राज्यांमध्ये मिळालेले प्रचंड बहुमत आणि तेलंगणा राज्यामध्ये वाढलेली मतांची टक्केवारी ही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या लोकप्रियतेची गृहमंत्री अमित शहा यांच्या रणनीतीची आणि राष्ट्रीय अध्यक्ष जे.पी.नड्डा यांच्या संघटन कौशल्याची पावती आहे.आगामी लोकसभा निवडणुकीमध्ये पुन्हा एकदा नरेंद्र मोदी यांचे भारतीय जनता पार्टीचे ३०० पेक्षा जास्त खासदार निवडून येतील याची नांदी आहे असे प्रतिपादन शिक्षण महर्षी भारतीय जनता पार्टीचे नेते माजी आमदार भीमराव धोंडे यांनी केले .

आष्टी येथील भारतीय जनता पार्टीच्या संपर्क कार्यालयामध्ये मध्यप्रदेश, राजस्थान आणि छत्तीसगड येथील भारतीय जनता पार्टीच्या विजयाबद्दल विजय उत्सव साजरा करताना ते बोलत होते .

यावेळी भारतीय जनता पक्षाचे तालुका अध्यक्ष ड.साहेबराव मस्के महाराष्ट्र प्रदेश भारतीय जनता पार्टीचे अनुसूचित जाती मोर्चाची उपाध्यक्ष ड. वाल्मीकतात्या निकाळजे, युवा नेते संतोषभैय्या चव्हाण,रिपाई तालुकाध्यक्ष अशोक साळवे, बाबा गर्जे,बाजीराव वाल्हेकर, बबनराव औटे,चेअरमन अरुण सायकड ,उत्तम बोडखे,बाबु कदम , सदाशिव दिंडे,प्रदीप धोंडे गणेश धोंडे ,भीमराव विधाते,एस.बी.साळवे,अभय गर्जे,राहुल निकाळजे,मुकुंद धोंडे आदि मान्यवर,भाजपचे पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते . भारतीय जनता पार्टीच्या संपर्क कार्यालय समोर उपस्थित भारतीय जनता पार्टीचे समर्थक आणि कार्यकर्त्यांनी फटाक्यांची आताशीबाजी करून भारतीय जनता पार्टीचा विजय उत्सव साजरा केला . पुढे बोलताना माजी आ. भीमराव धोंडे म्हणाले की,पाच राज्याच्या निवडणुका घोषित झाल्या त्यावेळी भारतीय जनता पार्टी विषयी अपप्रचार झाला मात्र भारतीय जनता पार्टीचे संघटन कौशल्य आणि भारतीय जनता



पार्टीच्या तळागाळातील कार्यकर्ता यांनी अथक परिश्रम करून मध्य प्रदेश राजस्थान आणि छत्तीसगड या ठिकाणी भारतीय जनता पार्टीचे सत्ता मिळवण्यात मोठे कामगिरी केले आहे.भारत देशाचे पंतप्रधान हे संपूर्ण जगामध्ये लोकप्रिय असून संपूर्ण जगाला ते सध्या मार्गदर्शन करत असून जणूकाही जगाचे पंतप्रधान आहेत इतके ते लोकप्रिय झालेले आहेत त्यांच्या प्रगतिशील आणि दूरदर्शीपणाच्या नेतृत्वाखाली भारतीय अर्थव्यवस्था अत्यंत प्रगतीपथावर असून थ्री ट्रिलियन डॉलर्सकडे आपला अर्थव्यवस्थेचा प्रवास सुरू आहे असे सांगत पंतप्रधान मोदी यांच्या लोकप्रियता मोठ्या प्रमाणावर असून त्यांच्या कामाकडे पाहून त्याचबरोबर भारतीय जनता पार्टीचे रणनीती कार समजले जाणारे गृहमंत्री अमित शहा यांनी राष्ट्रीय अध्यक्ष जगत प्रकाश नड्डा यांनी कुशल तेने संघटन कौशल्य दाखवून या तीनही राज्यांमध्ये विजय मिळवलेला आहे तेलंगणामध्ये देखील एक विधानसभा सदस्य असताना आता त्याठिकाणी १० झालेले आहे. मतांची टक्केवारी देखील वाढलेली आहे मागील विधानसभा निवडणुकीमध्ये मध्यप्रदेश राजस्थान छत्तीसगड आणि तेलंगणा या राज्यांमध्ये विधानसभा निवडणुकीमध्ये भारतीय जनता पार्टीची पीछेहाट झाली होती तरी देखील नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली लोकसभा निवडणुकीमध्ये तेलंगणा राज्यामध्ये चार खासदार भारतीय जनता पार्टीचे निवडून आले होते

आणि मध्य प्रदेश राजस्थान छत्तीसगड या ठिकाणी अत्यंत किरकोळ जागा काँग्रेसला मिळाले होते आणि भारतीय जनता पार्टीचे मोठ्या प्रमाणावर खासदार निवडून आले होते आता तर या तिने चारही राज्यांमध्ये भारतीय जनता पार्टीच्या मताधिक्यामध्ये मोठी वाढ झाली असून मतांची टक्केवारी देखील वाढलेली असल्यामुळे आगामी लोकसभा निवडणुकीमध्ये भारतीय जनता पार्टी ३०० पेक्षा जास्त जागा विजयी होऊन पुन्हा एकदा नरेंद्र मोदी यांचे सरकार भारत देशामध्ये स्थापन होईल यामध्ये शंका नाही त्यासाठी कार्यकर्त्यांनी आतापासूनच मतदारांशी संपर्क साधून नरेंद्र मोदी यांच्या केंद्र शासनाचे आणि महाराष्ट्रातील भाजपा शिवसेना युतीच्या शासनाची कामे सर्वसामान्य लोकांपर्यंत पोहोचवावीत असे आवाहनही त्यांनी माजी आ.भीमराव धोंडे यावेळी केले.यावेळी मुर्शदपूरचे माजी सरपंच संतोषभैय्या चव्हाण,तालुकाध्यक्ष ड.साहेबराव म्हस्के,शंकर देशमुख, बाबासाहेब गर्जे यांची समयोजीत भाषणे झाली.संचलन व आभार भाजपनेते शंकर देशमुख यांनी मानले .

बीड जिल्हा भाजपचे सचिव शंकर देशमुख यांची मध्यप्रदेशात महाराष्ट्र प्रदेश भाजपने सोनकच्छ विधानसभा मतदार संघात विस्तारक म्हणून नियुक्ती केली होती. याठिकाणे भाजपचे डा.राजेश सोनकर हे २४ हजार ५०० मतांनी विजयी झाले आहेत .शंकर देशमुख यांचे या मतदार संघातुन निवडुन आलेले आ.डा. राजेश सोनकर आणि पदाधिका-यांनी अभिनंदन केले .

# हम सात-सात हैं!

# फटाक्यांची आतिषबाजी करत बीड शहरातील बशीगंज चौकात विजयाचा जल्लोष साजरा

बीड ।प्रतिनिधी

मध्यप्रदेश, राजस्थान आणि छत्तीसगड, तेलंगाणा, मिझोरम या पाच राज्यांच्या निवडणुका नुकत्याच पार पडल्या. या निवडणुकीत एमआयएमने तेलंगाणा राज्यात ९ पैकी ७ जागांवर विजय मिळवला. या विजयाबद्दल एमआयएमचे राष्ट्रीय अध्यक्ष खा.असुदोद्दीन ओवेसी, आमदार अकबर ओवैसी, महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष खा.इम्तियाज जलील, कार्याध्यक्ष-गफ्फार कादरी, मराठवाडा अध्यक्ष फराज लाला, प्रदेश उपाध्यक्ष-सय्यद मोईन यांनी विजयी उमेदवारांचे अभिनंदन केले आहे. तर बीड शहरात बशीरगंज चौकात प्रचंड फटाक्यांची आतिषबाजी करून व पेढे वाटप करून विजयाचा जल्लोष साजरा करण्यात आला.



याबाबत अधिक असे की, नुकत्याच पार पडलेल्या तेलंगाणा राज्यातील विधानसभा निवडणुकांचा निकाल काल दि.०३ डिसेंबर २०२३ रोजी हाती आला. यामध्ये सुरूवातीपासूनच एमआयएमचे उभे असलेले ९ उमेदवारांपैकी ७ उमेदवारांनी आघाडी घेतली होती. पुर्ण निकाल हाती येईपर्यंत ७ उमेदवारांच्या विजयावर शिक्कामोर्तब झाले. या विजयाचा जल्लोष बीड शहरातील बशीरगंज चौकात एमआयएमचे जिल्हाध्यक्ष ॲड.शेख शफिक भाऊ यांच्या नेतृत्वाखाली साजरा करण्यात आला. यावेळी बोलतांना ॲड.शेख शफिक भाऊ म्हणाले की, एमआयएमवर जो मतदारांनी विश्वास दाखवला त्या विश्वासाला कधीही तडा जाणार नाही. एमआयएमने केलेल्या समाजापायोगी कामाची ही पावती आहे. एमआयएमचे राष्ट्रीय अध्यक्ष असद औवेसी यांच्या विकासाच्या दृष्टीला, सर्वसमाज हिताच्या कार्याला बळ या विजयामुळे मिळाले. खा.असद औवेसी, आ.अकबर औवेसी यांच्या लोकप्रियतेची, संघटन कौशल्याची ही पावती आहे. आगामी निवडणुकांमध्ये देखील एमआयएमचे आमदार, खासदार , नगराध्यक्ष निवडुन येतील याचीच ही नांदी आहे. एमआयएम समर्थक आणि कार्यकर्त्यांनी फटाक्यांची आताशीबाजी करून विजय उत्सव साजरा केला. यावेळी बीड तालुका अध्यक्ष खन्ना भैय्या, युवक जिल्हाध्यक्ष शेख मतीन, शहर अध्यक्ष शिवाजी भोसकर, नगरसेवक मोमीन अजहर, जिल्हा उपाध्यक्ष शेख युसूफ,शहर उपाध्यक्ष शेख शाकेर, जिल्हा सहचिटनीस अन्वर पाशा, तालुका उपाध्यक्ष साजन चौधरी, युवक शहर अध्यक्ष शेख सलमान,मार्गशक रियाज खान, जिल्हा समन्वयक सय्यद सैफअली (लालु भैय्या), बांधकाम शहर अध्यक्ष सय्यद बासेद, अरबाज भाई, सोशल मीडिया जिल्हाध्यक्ष सोहेल शिकलकर, फारुख खान, नईम मेम्बर, नबाब भाई, सलाम सेठ, नेहाल भाई, ईमरान खान, फेरोज मनियार, इलियास भाई, शेख मुदस्सीर, आदील भाई, सफी दादा, अयान इनामदार,अलीम भाई , नसीर भाई, वाजेद खान, अली बाबा, रिजवान खान , जाकेर चौधरी, अरीब भाई , आवेज भाई, आदी मोठ्या संख्येने उपस्थिती होते

# चौसाळा शहरात दिवसा ढवळ्या झालेल्या चोरीचा तपास लागणार का? एस पी साहेब नेकनुर पोलीस स्टेशनला खमक्या अधिकारयाची गरज

बीड ।प्रतिनिधी

बीड तालुक्यातील नेकनुर पोलीस स्टेशन अंतर्गत येत असलेल्या चौसाळा शहरासह परिसरात गुन्हेगारीचे प्रमाण गेल्या काही दिवसापासुन वाढले आहे काल अशासतच भरदुपारी चौसाळा शहरातील रहीवाशी सतिष सर्जेराव माने यांचे गायत्री नगर भागातील घर अज्ञात चोरटंयानी घराचे कुलुप तोडुन दिवसा ढवळ्या घरातील सहा तोळे सोने,रोख रक्कम ८० हजार व सि सि टिव्हीचा डिव्हिआर चोरट्यांनी पळवला असल्यामुळे चौसाळा शहरासह परिसरात भितीचे वातावरण निर्माण झाले असुन या घटनेमुळे नेकनुर पोलीसा समोर एक या चोरीचा तपास लावण्याचे मोठे आव्हानच उभे राहीले आहे दिवसा ढवळ्या झालेल्या या चोरीमुळे चौसाळा शहरासह परिसरात भितीचे वातावरण निर्माण झाले आहे. चौसाळा व परिसरात गुन्हेगारीचे प्रमाण वाढले असुन नेकनुर पोलीसांनी या



चोरीतील घटनेचा तपास तात्काळ लावावा अशी मागणी सर्व सामान्य नागरिकांतुन होत असुन तसेच चौसाळा पोलीस चोकीला चारच कर्मचारयावरती पंसवीस गावचा भार असल्यामुळे याठिकाणी पोलीस कर्मचारी संख्या वाढवण्याची मागणी देखील कित्येक दिवसापासुन होत आहे परंतु या गोष्टीकडे दुर्लक्ष होत असल्याचे पाहावयास मिळत आहे नेकनुर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक विलास हजारे यांची तात्काळ बदली करून याठिकाणी एका खमक्या अधीकारयाची गरज असल्याची देखील चर्चा दबक्या आवाजात होत आहे बीड जिल्हा पोलीस अधीकक्षानी तात्काळ नेकनुर पोलीस स्टेशनला कर्तव्यदक्ष पोलीस निरीक्षक देण्याची मागणी होत आहे

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT